**महाराष्ट्र शासन**

अत्यंत तातडीचे

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
**दिनांक- ०९.०५.२०२०**

प्रति,

जिल्हाधिकारी ........................................(सर्व)
आयुक्त महानगरपालिका ............................(सर्व)
कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका.
उपसंचालक आरोग्य सेवा, परिमंडळे ..................(सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय..............(सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद...............(सर्व)
वैद्यकिय आरोग्य अधिकारी , महानगरपालिका ....... (सर्व)

**विषय:- कोवीड १९ रुग्णांसाठी सुधारीत डिस्चार्ज पॉलिसी**

**संदर्भ:- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ८/५/२०२०**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोवीड १९ रुग्णांसाठी निश्चित केलेल्या त्रीस्तरीय संस्थात्मक रचनेनुसार या रुग्णांसाठी सुधारीत डिस्चार्ज पॉलिसी तयार करण्यात आली आहे. ही पॉलिसी रुग्णांच्या लक्षणाच्या स्थितीवर अवलंबून आहे.

(https://www/mohfw.gov.in/pdf/finalGuidanceonMangaementofCovidcasesversion२.pdf)

या सुधारीत धोरणानुसार पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## १) सौम्य, अति सौम्य व लक्षणे नसलेले रुग्ण :-

- सौम्य, अति सौम्य व लक्षणे नसलेल्या ज्या रुग्णांना आरोग्य संस्थांमध्ये दाखल करण्यात आले असेल त्यांची दररोज दोन वेळा शरीराच्या तापमानासाठी आणि पल्स ऑक्सीमिटरद्वारे $SpO_2$ तपासणी करण्यात यावी.
- रुग्णाला लक्षणे सुरु झाल्यापासून ७ व्या, ८ व्या व ९ व्या दिवशी ताप नसल्यास १०व्या दिवशी तपासणी करुन डिस्चार्ज देण्यात यावा.
- **या रुग्णांना डिस्चार्ज करीत असतांना कोवीड विषाणुसाठी प्रयोगशाळा तपासणीची आवश्यकता नाही.**



Scanned with CamScanner